श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

<u>शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक.</u>

आषाढी यात्रा कालावधीत शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करणेकामी जाहीर दरपत्रके मागविण्यात येत आहे. या संबंधीची माहिती, अटी, शर्ती व दरपत्रक फॉर्म तुकाराम भवन, पंढरपूर येथे आणि www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. इकडील नमूना फॉर्ममध्येच दरपत्रक भरून देणेची आहे. तसेच अनामत रक्कम रू.५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. सिलबंद दरपत्रके कार्यकारी अधिकारी, श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचे नावे दिनांक २१/०६/२०१६ रोजी सायं.५.०० वाजेपर्यंत पोहोचेल अशी पाठवावी. प्राप्त दरपत्रके दिनांक २२/०६/२०१६ रोजी तुकाराम भवन येथे स.११.०० वा. उघडल्या जातील.

क्र.जमीन विभाग/कावि/४२८/२०१६ दि.१४/०६/२०१६

सही xxx
कार्यकारी अधिकारी
(संपर्क क्र. ०२१८६—२२३५५०,
९४२१०४०३२४)

# श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

## **दरपत्रक फॉर्म**

शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामाचे दरपत्रक.

प्रति,
मा.कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर.

विषयः— शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामाचे दरपत्रक.

ठेकेदाराचे पूर्ण नाव :— श्री.————————————————————

पूर्ण पत्ता :— ————————————————————

————————————————————

मोबाईल कं.:— ————————————————————

महोदय,

श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर समिती, पंढरपूरचे वतीने शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामाची दिनांक १५/०६/२०१६ रोजीचे दैनिक दिव्य मराठी, सोलापूर या वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेल्या जाहीरातीप्रमाणे सदर कामाचे दरपत्रक खालीलप्रमाणे सादर करीत आहेत.

| अ क्र | **तपशील** | दर (रू.) प्रति नग |
|---|---|---|
| १ | शुध्द थंड पाण्याने भरलेला जार (१८ लिटर) | |

सदर दराने ११ ते १९/०७/२०१६ या कालावधीत शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करणेस मी बांधील राहील. तसेच याबाबतच्या आपणाकडून देण्यात आलेल्या अटी व शर्ती मला मान्य असून त्यासंबंधीचे जरूर ते प्रतिज्ञापत्र स्टॅम्पपेपरवर करून देण्यास तयार आहे. रू.५,०००/— अनामत रकमेचा डी.डी. /पावतीची झेरॉक्स प्रत सोबत जोडली आहे. तरी वर नमुद दरपत्रकाप्रमाणे शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करणेचे काम मला मिळण्यास विनंती आहे.

दिनांक /०६/२०१६ पुरवठाधारकाची सही

सोबत खालील कागदपत्रे जोडलेली आहेत

१. अनामत रक्कमेचा डी.डी/ रोखीच्या पावतीची झेरॉक्स प्रत.
२. पूर्वी शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा केलेल्या कामाची अनुभवाची प्रमाणपत्रे.
३. स्वतःच्या ओळखपत्राची झेरॉक्स प्रत. (उदा. पॅनकार्ड, मतदान कार्ड व आधारकार्ड)
४. व्यवसाय परवाना.
५. नोंदणी प्रमाणपत्र.
६. पॅनकार्ड

**श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**

**शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा कामाचे जाहीर दरपत्रक**

माहिती, अटी व शर्ती खालीलप्रमाणे.....

१. नमूना दरपत्रक फॉर्म कार्यालयीन वेळेत तुकाराम भवन येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील. दरपत्रक फॉर्म स्वतंत्र लिफाप्यात सिलबंद करून सादर करणे आवश्यक आहे. लिफाप्यावर ठेकेदाराचे नाव व पूर्ण पत्ता आणि दरपत्रक शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा करणे कामासाठी भरलेली आहे, असा सविस्तर तपशिल नमुद करावा. दरपत्रक समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावे किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

२. अनामत रक्कम रू.५,०००/—डी.डी./रोख स्वरुपात भरणे आवश्यक आहे. डी.डी. 'कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर' यांचे नावे काढावा.

३. पुरवठादाराने निविदा फॉर्ममध्ये नमुद केलेल्या दराने ११ ते १९/०७/२०१६ या कालावधीत शुध्द थंड पाण्याने भरलेले जार पुरवठा इकडील मागणी प्रमाणे करणे आवश्यक आहे.

४. पुरवठा करावयाच्या मालाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| तपशिल | आवश्यक गुणवत्ता | अंदाजे लागणारे जार |
|---|---|---|
| शुध्द थंड पाण्याने भरलेला जार (१८ लिटर) | उत्तम | ५०००नग |

५. मंदिर समितीने ठरवून दिलेल्या अथवा निश्चित केलेल्या नमुन्यांतच दरपत्रक सादर करावे. अपूर्ण दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

६. थंड पाण्याने भरलेल्या जारची गुणवत्ता चांगली असणे आवश्यक आहे.

७. सदर कामाची परवानगी असलेबाबत सर्व प्रकारच्या शासकिय परवान्याच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. सदर मालाचा पुरवठा मंदिर समितीचे मागणीनुसार मुदतीत करणेचा आहे. त्यास विलंब झालेस पुरवठाधारकास जबाबदार धरून मालाच्या किमतीच्या ५ टक्के पर्यंत दंड आकारण्यात येईल.

९. माल खराब असल्याचे आढळून आलेस पुरवठा धारकास जबाबदार धरणेत येईल व त्याचे बील अदा केले जाणार नाही.

१०. पुरवठा करण्यात आलेल्या मालाची प्रत व प्रमाण संबंधित विभागाकडून मोजणी व तपासणी करून खात्री झाले खेरीज बील अदा केले जाणार नाही.

११. दरपत्रकात नमुद साहित्याचा दर सर्व करासहीत नमुद करावा. साहित्य पोहचविण्याचा वाहतुक खर्च, हमाली अथवा इतर अतिरिक्त कोणताही खर्च पुरवठाधारकास दिला जाणार नाही.

१२. दरपत्रकात नमुद सर्व तपशील नमूद करणे आवश्यक आहे. अपूर्ण दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१३. सदर कामाचे मंजुर दराव्यतिरिक्त कोणताही कर अदा केला जाणार नाही. तसेच सदर कामाचे बिल अदा करताना नियमानुसार २ टक्के आयकर कपात केली जाईल.

१४. सदर कामासाठी कोणतीही ॲडव्हान्स रक्कम अदा केली जाणार नाही.

१५. मालाचा पुरवठा करणेचे ठिकाण पदस्पर्शदर्शनरांगेत एकविरा देवी मंदिर, विणेगल्ली, चंद्रभागाघाट ते पत्राशेड येथे करणे आवश्यक आहे.

१६. माल वाहतुकी दरम्यान झालेल्या कोणत्याही दुर्घटनेस निविदाधारक जबाबदार राहील.

१७. समिती वेळोवेळी जे निर्देश देईल अथवा अटीत जे बदल करेल ते पुरवठाधारकांस बंधनकारक राहील.

१८. दरपत्रक ज्यांचे नांवे मंजूर झालेली आहे त्यांनी रक्कम रूपये १००/— चे स्टॅम्प पेपरवर सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे (affidivit) प्रतिज्ञापत्र करून देणे आवश्यक आहे.

१९. प्रशासकीय व अन्य कारणास्तव दरपत्रक कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.

२०. सदर कामासंबंधी काही वाद उद्‌भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

२१. वरील कोणत्याही एका अटी व शर्तीचा भंग झालेस पुरवठादारास जबाबदार धरणेंत येईल व मंजूर दरपत्रक कोणत्याही क्षणी रद्द केली जाईल.

२२. पुरवठा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखुन ठेवलेला आहे.